लोकमत

सांगितले.

# मेट्रोचा तिसरा रेकही होणार दाखल!

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ च्या मार्गासह आरेमधील कारशेडचे काम वेगाने सुरू असून, या कामाची कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक आश्विनी भिडे यांनी गुरुवारी पाहणी केली. मेट्रोचे आतापर्यंत दोन रेक मुंबईत दाखल झाले असून, तिसरा रेकही काही दिवसांत मुंबईत दाखल होणार आहे. या कामाचा आढावाही भिडे यांनी घेतला. दरम्यान, कारशेडमधील वर्कशॉप, ओसीएस बिल्डिंग, स्थानकांच्या कामांसह उर्वरित कामांनी वेग पकडला आहे. त्यामुळे मुंबईकरांसाठी ही आनंदाची बातमी असून मेट्रोच्या कामांनी प्रचंड वेग घेतल्याचे चित्र आहे.



## प्रत्येक महिन्याला २ मेट्रो येणार



**९ मेट्रो** दाखल होतील.

**३१ मेट्रो** एकूण दाखल होणार.

१) आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथील ट्रेन फॅक्टरीमध्ये मेट्रो ट्रेन्स तयार होत असून, आता मुंबईत तात्पुरती ट्रेन रिसिविंग फॅसिलिटी कार्यान्वित करण्यात आली आहे.

२) पहिली ट्रेन मुंबईत आणण्यातही आली. तिच्या चाचण्या बोगद्यामध्ये सुरू झाल्या. दुसरी ट्रेनही डिसेंबरमध्ये आली.

३) आता तिसरी ट्रेन लवकरच दाखल होणार आहे.

Hello Mumbai
Page No. 4 Apr 21, 2023
Powered by: erelego.com